स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन

मोटार वाहन विभाग

**उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बोरीवली**

सीटीएस नं.ब५३/४, बी.एस.सी. रोड डेपो इमारत, कांदरपाडा,

कांदरपाडा, दहिसर (पश्चिम), मुंबई ४०० ०६८.

Email ID : dyrto.47-mh@gov.in

दूरध्वनी क्रमांक- ०२२- २८९१९७६८

उप प्रा प का/ बोरीवली/ खटला / आदेश/ २०२३/जा. क्र. 1388 दि. 05 JUN 2023

प्रति,

--------------------------------

--------------------------------

--------------------------------

**विषय:- मोटार वाहन कायद्यातील कलम १२९ व १९४ड मधील हेल्मेट वापरासंबंधी तरतूदींची अंमलबजावणी करणेबाबत.**

**संदर्भ :-** मा.परिवहन आयुक्त,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक २०.०५.२०२३ रोजीच्या CIRT, पुणे येथील बैठकीतील निर्देश.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,बोरीवली कार्यक्षेत्रात सन २०२२ व सन २०२३ मध्ये घडलेल्या अपघाताचे तुलनात्मक विश्लेषण केले असता घडलेल्या एकूण रस्ते अपघातामध्ये दुचाकी व पादचाऱ्यांचे अपघात मोठ्या प्रमाणात होत असल्याचे दिसून येते. सदर बाब ही रस्ता सुरक्षतेच्यादृष्टीने अतिशय चिंताजनक आहे.

मोटार वाहन कायदा , १९८८ चे कलम १२९ अन्वये, दुचाकीस्वार व पिलियन (pillion) यांनी वाहन चालविताना हेल्मेटचा वापर करणे हे रस्ता सुरक्षेच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाचे आहे.या तरतूदींचा भंग करणाऱ्या वाहनचालकांविरुध्द तसेच त्यास संमती देणाऱ्या व्यक्तीस मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १९४ ड च्या अंतर्गत दंडाची तरतूद आहे. मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १२९ व १९४ ड मध्ये खालीलप्रमाणे प्रावधान आहे.

"Sec. 129- Wearing of protective headgear:- Every person above four years of age, driving or riding or being carried on a motorcycle of any class or description shall., while in public place ,wear protective headgear to such standards as may be prescribed by the Central Government "

"Sec.194 D Penalty for not wearing protective headgear:- Whoever drives a motorcycle or cause or allows a motorcycle to be driven in contravention of the provisions of section 129 or the rules or regulations made thereunder shall be punishable with a fine of one thousand rupees and he shall be disqualified for holding licence for a period of three months"

मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १९४ ड मधील तरतूदीनुसार आपणांस कळविण्यात येते की, आपल्या कार्यालयात/ आस्थापना/ कंपनीमध्ये विनाहेल्मेट दुचाकीवर प्रवेश करणाऱ्यांस प्रतिबंध करावा. तसेच आपणांस असे सूचित करण्यात येते की, १९४ ड च्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीकोनातून आपल्या कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेज तपासून अशा विनाहेल्मेट दुचाकीवर येणाऱ्यांची यादी आपण या कार्यालयास सादर करावी किंवा सीसीटीव्ही फुटेज तपासण्यासाठी येणाऱ्या अधिकाऱ्यांना सहकार्य करावे, जेणेकरुन मोटार वाहन कायद्यातील विहित तरतूदीनुसार संबंधीतांवर कारवाई करणे शक्य होईल.

05/06/23

**(शाम कासार)**

**सहा.प्रादेशिक परिवहन अधिकारी**

**बोरीवली**

**प्रत-** मा.परिवहन सह आयुक्त (रस्ता सुरक्षा कक्ष,) परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई याना माहितीस्तव सविनय सादर.